# श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०१५

# दिलीप नामदेवराव पवार उर्फ दिलीप बाबा यांना जाहीर

अमरावती, दि. २६ (प्रतिनिधी) : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने सर्व सामान्यांच्या माहिती करीता कळविण्यात येते की, विनिमय क्र. २४/२००२ नुसार माजी आमदार द.ना. उपाख्य बबनराव मेटकर यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून सुरू करण्यात आलेल्या कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार-२०१५ साठी जेष्ठ समाजसेवक श्री दिलीप नामदेवराव पवार उर्फ दिलीप बाबा, रा. लाठी, पो. शेलुबाजार, ता. मंगरूळनाथ, जि. वाशिम यांची पुरस्कार निवड समितीने एकमताने निवड केली आहे.

संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीनुसार कार्य करणारे जेष्ठ समाजसेवक श्री दिलीप नामदेवराव पवार उर्फ दिलीप बाबा यांनी अनेक समाजोपयोगी कार्य केले असून त्यासाठी आपले स्वत:चे संपूर्ण जीवन समर्पीत केले आहे. लहानपणापासूनच त्यांना प्राण्यांविषयी तळमळ राहीली आहे. कत्तलीसाठी जाणा-या गाई त्यांनी मुक्त केल्यात. गाईच्या सेवेसाठी लाठी या गावी गौरक्षण संस्थेची निर्मिती केली. आज त्याठिकाणी तीनशेच्यावर गाई आहेत. दिलीप बाबाच्या कार्यापासून प्रेरणा घेवून अनेक ठिकाणी लोकांनी गौरक्षण सुरू केले. मेळघाटासारख्या दुर्गम भागात ते प्रबोधन करतात. गावागावांमध्ये 'एक गाव एक सण' या अभिनव सकल्पनेचा ते प्रचार करतात. प्राणी हत्या थांबविण्यासाठी त्यांनी आपल्या जीवाची बाजी लावली. त्यांच्या प्रयत्नामुळे यात्रा व अनेक ठिकाणावरील प्राणी बळी प्रथा थांबली आहे.



व्यसनमुक्तीसाठी ते लोकांना मार्गदर्शन करतात. दिलीपबाबांच्या विचार व आचारावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या विचार व कार्याचा प्रभाव आहे. ऊन-पावसाची तमा न करता, सतत समाजोपयोगी, पर्यावरणपूरक, व्यसनमुक्ती व जीवदयाच्या कार्यात मग्न असणारे दिलीप बाबा यांना अनेक प्रतिष्ठीत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा 'कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०१५' घोषीत करण्यात आल्याचे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी कळविले आहे.

हिंदुस्थान दि० 27/11/15